# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ५५५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः–०१/०९/२०१६

**१) अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याने गुन्हा नोंद . :–**

फरवरी २०१६ ते माहे जुन २०१६ पर्यन्त यातील फिर्यादी अल्पवयीन पिडीत बालीकेच्या घरी आरोपी हा टिव्ही पाहण्या करीता येवुन घरी कोणीही नसतांनी पिडीत बालीकेवर तीचे ईच्छे विरुध्द तीला धमाकावुन तीला लग्नाचे आमिष दाखवुन तीच्याशी जबरदस्तीने वारंवार अत्याचार करुन तीला ५ महीण्याची गर्भवती केले असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३७६(२)(आय)(एन) भांदवि. सहकलम ६ बाल लैगिंक अत्याचार प्रतीबंधक कायदा २०१२ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. कुंभरे पो. स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**२) भांडण व अश्लिल शब्दात शिविगाळ करुन मारण्याची धमकी दिली. . :–**

दिनांक २८/०८/२०१६ रोजी २१.१५ वा दर. यातील फिर्यादी हा आपले वडील आबीद अली सैय्यद सोबत नमाज पठण करुन येत असतांनी आरोपी क्र. १ ने फिर्यादीस वाईट शिविगाळ करुन टोचुन बोलल्याने फिर्यादीने आरोपी क्र. १ यास हटकले असता यातील आरोपीतांनी संगनमत व भांडण करुन फिर्यादी व त्यांच्या वडीलांना आरोपी क्र. १ ने हाता बुक्यांनी मारहान केली व फिर्यादीच्या नाकाची हड्डी फॅक्चर झाल्याने व अश्लिल शब्दात शिविगाळ करुन धमकी दिली असे फिर्यादी चे व डॉ. एक्सरे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३२५,२९४,५०६,३४ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मस्के पो. स्टे. पवनी हे करीत आहेत.

**३) संगनमत करुन मारहान व पिटण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २८/०८/२०१६ रोजी २१.१५ वा. दर. यातील फिर्यादी तारीख जैनुल आबेदीन पाशा वय ५२ वर्ष, रा. गणेश वार्ड पवनी हा आपल्या घरा समोर सार्वजनीक रोडवर हरिकेजर हटवार यांचेशी बोलत असता यातील आरोपी क्र. १ ने फिर्यादीस तु मला ढिवर का म्हटले असे म्हणताच यातील आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीस अश्लिल शब्दात शिविगाळ करुन लाथा बुक्यांनी मारुन काठीने मारण्या पीटण्याची धमकी दिली असे फिर्यादीचे व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २९४,३२३,५०४,५०६,३४ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मस्के पो. स्टे. पवनी हे करीत आहेत.

**४) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई.:–**

दिनांक ३१/०८/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली ८९ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी तिन सिटर वाहनांवरती ०३ केसेस, अवैध प्रवासी ०१ केसेस तसेच ईतर वाहनांवरती ७८ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(के.एच.धात्रक)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.